# नाशिक महानगरपालिका, नाशिक

## गोदावरी संवर्धन कक्ष विभाग

इतिवृत्त

मा.उच्च न्यायालय मुंबई येथील जनहित याचिका क्र.१७६/२०१२ संदर्भात नाशिक महानगरपालिका नाशिक स्तरावरील उपसमितीची आढावा बैठक मा.आयुक्त तथा प्रशासक सो.यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २४/०४/२०२३ रोजी सकाळी ११:३० वाजता मा.आयुक्त सो.कार्यालय , मिटिंग हॉल ,राजीव गांधी भवन , मुख्यालय येथे संपन्न झाली.सदर बैठकीस खालील अधिकारी यांनी उपस्थिती नोंदविली.

१. मा.आयुक्त, मनपा, नाशिक - अध्यक्ष
२. NEERI चे प्रतिनिधी (Online प्रणालीद्वारे ) - सदस्य
३. मा.पोलिस उपआयुक्त,नाशिक - सदस्य
४. मा. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ. - सदस्य
५. मा.माहिती उपसंचालक, नाशिक - सदस्य
६. मुख्य कार्यकारी अधिकारी , ना.म्यु.स्मार्ट सिटी कं.लि. - सदस्य
७. मा. उपआयुक्त (गो.सं.क),मनपा,नाशिक - सचिव
८. मा.शहर अभियंता, सा.बा.वि. मनपा,नाशिक - निमंत्रीत सदस्य
९. मा.अधिक्षक अभियंता, साआअ(मलनि:) मनपा, नाशिक - निमंत्रीत सदस्य
१०. मा. स.स.न.र, नगर नियोजन विभाग, मनपा, नाशिक - ----"---"---
११. मा.उपआयुक्त,अतिक्रमण, मनपा, नाशिक - ----"---"---
१२. संचालक, घनकचरा व्यवस्थापन, मनपा, नाशिक - ---"---"---
१३. मा.कार्यकारी अभियंता पर्यावरण विभाग, मनपा, नाशिक - ---"---"----
१४. मा.जनसंपर्क अधिकारी, मनपा, नाशिक - ----"---"---
१५. मा. अधिकारी,माहिती व तंत्रज्ञान विभाग, मनपा, नाशिक - ----"---"---
१६. श्री.राजेश पंडित - अशासकियसदस्य
१७. श्री.निशिकांत पगारे - अशासकियसदस्य
१८. अजितकुमार परब (Online प्रणालीद्वारे )

सदर उपसमितीच्या बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थित केलेल्या मुद्द्यांवर चर्चा झाली.

**मलनिस्सारण विभाग**

| अ.न. | मुद्दा | खुलासा |
|---|---|---|
| १ | STP अपग्रेडेशन बाबत माहिती विचारण्यात आली . | अधीक्षक अभियंता श्री.चव्हाणके यांनी नाशिक महानगरपालिकेत चार एस टी पी प्लांट असले बाबत सांगितले आगर टाकळी व तपोवन येथे अमृत योजनेतून एसटीपी चे काम सुरू आहे. नाशिक मनपा मार्फत नाशिक शहरात सन २०१५ पुर्वी वेळोवेळी बांधुन कार्यान्वयीन झालेल्या तपोवन, आगरटाकळी, चेहडी व पंचक या ४ एसटीपीचे अपग्रेडेशनचा सविस्तर प्रकल्प अहवाल |

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| | | (DPR) केंद्रशासनास दि.११/११/२०२२ रोजी सादर केला आहे. सदर STP चे सविस्तर प्रकल्प अहवाल NRCD नवी दिल्ली यांचेमार्फत IIT Roorkee यांना दि. ०६/०४/२०२३ च्या पत्रान्वये प्रमाणित (appraisal) करणेसाठी पाठविले आहेत. अन्वये उपरोक्त चार STP पैकी तपोवन व आगर टाकळी एसटीपीचे डिपीआरचा अमृत २.० योजनेत समावेश करण्यात आला आहे. वरील दोन्ही प्रकल्पांना मुख्य अभियंता, म. जी. प्रा. नाशिक यांचे दि.२३/०२/२०२३ च्या पत्रान्वये मंजुरी प्राप्त झाली आहे. तसेच तांत्रिक मान्यता देतांना अटीशर्ती नुसार आयआयटी, मुंबई यांचेकडुन सविस्तर प्रकल्प अहवाल तपासणी (Vetting) करुन घेणेची कार्यवाही प्रगतीत आहे. |
| २ | नमामि गोदा बाबत सद्यस्थिती | श्री चव्हाणके अधीक्षक अभियंता यांनी सांगितले की नेमणुक केलेले कन्सल्टंट यांनी प्राथमिक अहवाल दिलेला आहे.अस्तित्वातील मलनिःसारण वाहिन्यांचा सर्वे सुरू असुन ३० टक्के पूर्ण झालेला असुन जीआयएस मॅपिंग चे काम सुरू आहे .<br>हा सर्वे रिपोर्ट जूनच्या पहिल्या आठवड्यात अपेक्षित आहे.<br>श्री पंडित यांनी वॉटर ऑडिट प्रमाणे सिवेज ऑडिट होणे बाबत सूचना मांडली.<br>श्री.पंडीत यांचे सूचनेप्रमाणे वॉटर ऑडिटचा समावेश सदर कामामध्ये यापूर्वीच केला आहे असे सांगितले. |
| ३ | कल्की कल्चरचा सिव्हिल ट्रीटमेंट प्लांट साठी काय इफेक्ट होऊ शकतो, त्याला किती कालावधी लागेल, इनलेट ठिकाणी काही होऊ शकते का अशी विचारणा केली. | श्री. अजितकुमार परब यांनी सांगितले की, कल्की कल्चर १००% काम करते. हे खूप इफेक्टिव आहे. नाल्यांमधून येणाऱ्या सांडपाण्यावर तसेच एसटीपीतून येणाऱ्या पाण्यावर कलकी वापरणे योग्य राहील. आगर टाकळी येथील एसटीपी प्लांट येथून येणारे दुर्गंधी बंद करण्यास मदत होईल.व एसटीपी मध्ये कल्की वापर शंभर टक्के परिणाम कारक आहे. |
| ४ | श्री पंडित यांनी एसटीपी प्लांट मुळे नदीपात्रात निर्माण होणारा फोम कलकी मुळे कमी होतो का अशी विचारणा केली. | श्री अजितकुमार परब यांनी फोम हा डिटर्जंट मुळे होतो तसेच BOD व COD कमी झालेला असतो, या ठिकाणी कलकीचा वापर झाल्यास फोम कमी होण्यास मदत होईल असे सांगितले. यावर |

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| | | मा.आयुक्त साहेब यांनी सूचना केल्या कि,अधीक्षक अभियंता श्री चव्हाणके यांनी याबाबत संबंधितांच्या संपर्कात राहावे. |
| ५ | पावसाळी नाल्यांमध्ये ४३ ठिकाणांबद्दल मलजल वाहणारी ठिकाणांबाबत विचारणा झाली. | श्री चव्हाणके यांनी ३४ ठिकाणी काम पूर्ण झाले आहे. त्यातील ७ कामे सुरु असून २ ठिकाणी नव्याने मलवाहिका टाकण्याचे कामे चालू असून मे २०२३ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे. |
| ६ | श्री निशिकांत पगारे यांनी नंदिनी नदी येथे गॅबियन वॉल बनवताना हॉलमध्ये माती आत मध्ये राहिलेली आहे अशी सूचना केली. | सदरची माती Coffer Dam ची असून ती काढण्यात येईल असे सांगण्यात आले. |
| ७ | श्री निशिकांत पगारे यांनी गोदावरी नदीकाठी असलेल्या अमरधाम येथील वाघाडी नाल्याच्या जवळ असलेल्या नवनाथ पंथी समाध्या उघड्या पडलेल्या असून या ठिकाणी गॅबियन वॉल होणे गरजेचे असल्याचे सांगितले. | स्मार्ट सिटी विभाग यांना सदरचे गॅबियन वॉल चे कामाचे नियोजन करावयास सांगितले. |

**यांत्रिकी विभाग**

| अ.न. | मुद्दा | खुलासा |
|---|---|---|
| ८ | C & D waste status ठेवणे | सदर काम सुरु करणेबाबतचा कार्यारंभ आदेश येत्या ८ ते १० दिवसात देण्यात येईल. |

**बांधकाम विभाग**

| अ.न. | मुद्दा | खुलासा |
|---|---|---|
| ९ | नाले concretization (नवश्या गणपती,शान मोटर्स,गोविंद नगर,अशोक हॉस्पिटल ) | येथून पुढे नदी करिता रिटेनिंग वॉल, कॉंक्रिटीकरण करू नये, नद्या व उपनद्यांना आवश्यक ठिकाणी फक्त गॅबीयन वॉल करा अशा सूचना देण्यात आल्या. |
| १० | नदी पुलावरील जाळ्या-पुलानिहाय संख्यात्मक माहिती | काही ठिकाणांचे निविदा प्रक्रिया सुरु असुन याबाबत कार्यवाही करून माहिती देण्यात येईल. |

**नगरनियोजन विभाग**

| अ.न. | मुद्दा | खुलासा |
|---|---|---|
| ११ | रेन वॉटर हार्वेस्टिंग बाबत विचारणा करण्यात आली. | नाशिक महानगरपालिकेमार्फत देण्यात येणाऱ्या विकसन परवानगी पत्रामाध्ये रेन वॉटर |

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| | | हार्वेस्टिंगकरणेबाबत अट नमूद करण्यात आलेली आहे.तसेच सदर बांधकामांना वापराचा दाखला देतेवेळी रेन वॉटर हार्वेस्टिंग केलेबाबत खात्री करण्यात येते.तथापि ज्या ठिकाणी भोगवटा दाखला देण्यात आलेला आहे. परंतु रेन वॉटर हार्वेस्टिंग व्यवस्था सुस्थितीत ठेवलेली नाही अशा इमारतींचे मनपाच्या अभियंतातांकडूनव्यापक सर्व्हेक्षण करण्यात येऊन रेन वॉटर हार्वेस्टिंग सुस्थितीत नसलेल्या इमारतींवर दंडात्मक कारवाई करणेत आली आहे. रेन वॉटर हार्वेस्टिंगबाबत व्यापक सर्व्हेक्षणाची मोहीम हाती घेण्यात येउन ५२० इमारतींचे सर्व्हेक्षण करण्यात आले.त्यापैकी ३९६ इमारतींमध्ये रेन वॉटर हार्वेस्टिंग कार्यान्वित असल्याचे निदर्शनास आले.उर्वरित ११८ इमारतींवर दंडात्मक कार्यवाही करून र,रु.११८०००/- इतका दंड वसूल करण्यात आलाआहे.तसेच महानगरपालिकेच्या मालकीच्या इमारतींवर देखील रेन वॉटर हार्वेस्टिंगव्यवस्था करण्याचे काम करण्यात आले आहे.<br>रेन वॉटर हार्वेस्टिंगची उत्कृष्ठ अंमलबजावणी करणाऱ्या गृहनिर्माण संस्थाना पुरस्कार देऊन त्यांना गौरविण्यात यावे. तसेच ज्या इमारतींनी रेन वॉटर हार्वेस्टिंग केलेली नसेल अशा इमारतींना नोटीस देण्यात याव्यात अशा सूचना देण्यात आल्या. |
| १२ | Red line, Blue line marking बाबत नाल्यांची माहिती,मोजणी,नकाशे इ. website वर प्रसिध्द करणे. | महानगरपालिकेमार्फत संपुर्ण महानगरपालिका हद्दीतील GIS Mapping चे काम तसेच त्याअंतर्गत ड्रोन सर्व्हेचे काम प्रगतीपथात आहे.त्याअनुषंगाने जलसंपदा विभागास आवश्यक असलेली माहिती पुरविण्यात येईल. |

**स्मार्ट सिटी**

| अ.न. | मुद्दा | खुलासा |
|---|---|---|
| १३ | लेंडी नाल्याचे काम | १००% पूर्ण झाले आहे. |
| १४ | नाल्यांचे concretization काढणे बाबत कार्यवाही | सदर कामे हि पावसाळ्यापूर्वी पूर्ण करणेत यावे याबाबत सूचना देण्यात आल्या. |

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| १५ | रिटेनिंग वाल बाबत | येथून पुढे नदी करिता रिटेनिंग वॉल हा विषय वगळावा, कॉंक्रिटीकरण करू नये, नैसर्गिक प्रवाहांना कॉंक्रिटीकरण करू नये, नद्या व उपनद्यांना गॅबीयन वॉल करा अशा सूचना आयुक्त साहेब यांनी दिल्या. आदेशित केले कि सदर कामे हि पावसाळ्यापूर्वी पूर्ण करणेत यावी.<br>याबाबत श्री.पगारे यांनी सदर विषय मा.उच्च न्यायालयात असलेने त्यांचे निर्णयाप्रमाणे पुढील कार्यवाही करावी असे सांगितले. |

**घनकचरा व्यवस्थापन विभाग**

| अ.न. | मुद्दा | खुलासा |
|---|---|---|
| १६ | प्लास्टिक बंदी बाबत | घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून जास्तीत जास्त दंड आकारणी करावी सदर बाबत सतत मोहीम घेण्यात यावी अशा सूचना देण्यात आल्या. मागील तीन महिन्यात एकूण ३१५०००/- रु.दंड आकारण्यात आला आहे. |
| १७ | ट्रेश स्कीमर बाबत | काठावरील पानवेली मशीनने काढणे शक्य होत नाही त्याकरिता अतिरिक्त मनुष्यबळ पुरविणे बाबत निविदा कार्यवाहीत आहे असे सांगितले. |

**N.L.U.M.**

| अ.न. | मुद्दा | खुलासा |
|---|---|---|
| १८ | कापडी पिशव्यांचा मुद्दा | मा आयुक्त साहेब यांनी उपआयुक्त डहाळे मॅडम यांना कापडी पिशव्यांचे काम महिला बचतगट/स्वयंरोजगार बचत गट तसेच इतर कंपन्या व बँका यांच्याशी टाय अप करून कापडी पिशव्या उपलब्ध कशा करून देता येईल याकरिता कार्यवाही करावी तसेच प्लास्टिक बाबत बैठकीच्या वेळी सदराचा विषय घ्यावा अशी सूचना दिली.<br>कापडी पिशव्यांवर सूचना स्पष्ट दिसतील असे सूचित केले तसेच कापडी पिशव्यांवर मनपाचा लोगो असावा असे सुचविले.बचत गटामार्फत विविध जागेंवर Vending Machine द्वारे सदरकापडी पिशव्या उपलब्ध करण्याच्या सूचना देण्यात आल्या. |

Scanned by CamScanner

**शिक्षण विभाग**

| अ.न. | मुद्दा | खुलासा |
|---|---|---|
| १९ | जनजागृती कार्यक्रम राबविणे बाबत. | जनजागृती शिक्षण विभागामार्फत केली जाते व वेळोवेळी त्याचा अहवाल सादर केला जातो. मागील तीन महिन्यात विविध कार्यक्रमात एकूण ७४६ शाळांनी सहभाग घेऊन त्यात एकूण १९१७१५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. |

येणे प्रमाणे चर्चा होऊन बैठकीच्या शेवटी उपआयुक्त श्री.मुंडे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले व बैठक संपल्याचे जाहीर करण्यात आले.

(चंद्रकांत पुलकुंडवार)
आयुक्त तथा प्रशासक
नाशिक महानगरपालिका नाशिक

स्थळ :- नाशिक महानगरपालिका नाशिक.
दिनांक :-२७/०४/२०२३
जा.क्र.गो.सं.क./वशि/६3/२०२३

27.4.23
आवक लिपीक
विभागीय आयुक्त कार्यालय नाशिक
नाशिकरोड, पिन-४२२१०१